# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
Maharashtra Prathamik Shikshan Parishad
(Govt. of Maharashtra Undertaking)


जा.क्र. मप्राशिप/सशिअ/शिक्षक प्रशिक्षण/२०१७-१८/२३५८ दिनांक : 21 JUN 2017

**विषय : शिक्षक समृद्धीकरणासाठी सन २०१७-१८ मध्ये शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत.**

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत एप्रिल-२०१७ पर्यंत १०० टक्के मुले प्रगत होण्याचे उद्दिष्ट निर्धारित केले आहे. तथापि, माहे एप्रिल-२०१७ अखेरपर्यंत फक्त ४१,००० शाळा प्रगत झाल्याचे दिसून येते. यावरून निर्धारित उद्दिष्ट साध्य करण्यात अद्याप पूर्णतः यश प्राप्त झालेले नाही. मुलांना वाचन आल्याशिवाय लेखन जमणार नाही हे विविध शैक्षणिक सर्वेक्षणावरून दिसून येते. तसेच गणितामधील मुलभूत संकल्पना दृढीकरणासाठी पायाभूत कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे. या विषयातील संकल्पना दृढीकरणासाठी व मुलांना त्यातून आनंद मिळण्यासाठी भरपूर शैक्षणिक साहित्य वर्गामध्ये उपलब्ध असावयास हवे.

सन २०१७-१८ मध्ये प्रत्येक मुलाला वाचन, लेखन व गणितातील मुलभूत क्रिया अवगत व्हाव्यात यासाठी महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांनी भाषा व गणित या विषयातील विविध संकल्पनांवर आधारित साहित्य विकसित केले आहे. तसेच या संदर्भात शिक्षकांना द्यावयाच्या प्रशिक्षणाचे नियोजन विद्या प्राधिकरण स्तरावरून करण्यात येत आहे.

मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी राज्य व जिल्हा स्तरीय शैक्षणिक संस्थांची जबाबदारी महत्त्वाची आहे. याकामी या संस्थांची पुनर्रचना व सक्षमीकरण करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने दिनांक १७/१०/२०१६ रोजी या संस्थांची पुनर्रचना करण्यात आली. शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीनुसार शैक्षणिक प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे या संस्थेची पुनर्रचना करून त्यामध्ये विषयनिहाय विभागांची निर्मिती करण्यात आली. तसेच जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था यामध्ये याचप्रमाणे विभाग तयार करण्यात आले आहेत.

वरील सर्व शैक्षणिक सुधारणा या १०० टक्के मुलांच्या शिकण्याच्या दृष्टीने करण्यात आल्या आहेत. प्रशिक्षणाच्या स्वरूपामध्येही आमूलाग्र बदल करण्याबाबत शासनाने दिनांक ०८/०६/२०१७ च्या शासन निर्णयाने घेतला आहे. यापुढील सर्व प्रशिक्षणे ही मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीच्या परिणामांसाठी घेण्यात येतील. प्रत्येक प्रशिक्षण हे स्पष्ट उद्दिष्ट निश्चित करून त्याचा परिणाम मिळेल या हेतूने आयोजित करण्यात येतील. **प्रशिक्षणाच्या बाबत धोरण स्पष्ट असल्याने यापुढील सर्व प्रशिक्षणे राज्य स्तरावरील सुकाणू समिती किंवा महाराष्ट्र विद्या प्राधिकरण यांच्या मान्यतेशिवाय घेता येणार नाहीत. त्यामुळे यापुढे सर्व शिक्षा अभियानांतर्गत शिक्षक प्रशिक्षणासाठी मंजूर निधी फक्त मान्य असलेल्या प्रशिक्षणासाठीच विनियोगात आणता येईल. याव्यतिरिक्त कोणत्याही प्रशिक्षणावर केलेला खर्च ग्राह्य धरला जाणार नाही.**

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत मागणीनुसार प्रशिक्षण हे तत्त्व स्विकारले आहे. त्यानुसार ३.९५ लाख शिक्षकांनी आत्तापर्यंत प्रशिक्षणाची मागणी केली आहे. त्यामध्ये तंत्रस्नेही प्रशिक्षणाची मागणी मोठ्या संख्येने आहे. यासाठी महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे जोमाने काम करत आहे.




सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया

Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

सन २०१७-१८ मध्ये घ्यावयाच्या प्रशिक्षणाचा वार्षिक राज्यस्तरीय आराखडा व वेळापत्रक महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांचेकडून तयार करण्यात येत असून त्यास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर त्याबाबतच्या सूचना महाराष्ट्र विद्या प्राधिकरण स्तरावरून निर्गमित करण्यात येतील. त्याप्रमाणे सन २०१७-१८ मधील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येईल.

सन २०१७-१८ मध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत शिक्षक प्रशिक्षणासाठी तरतूद दिनांक ०९/०२/२०१७ रोजी झालेल्या भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीतील इतिवृत्तात मंजूर करण्यात आली आहे. प्रशिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून योग्य प्रशिक्षण स्थळ, आवश्यक सुविधा, प्रशिक्षण साहित्य व प्रशिक्षक हे घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यासाठी प्रशिक्षणाच्या तरतुदीमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. याबाबत आपणांस स्वतंत्रपणे सूचना निर्गमित करण्यात येतील.

सन २०१७-१८ मध्ये सुकाणू समितीच्या मान्यतेने घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाच्या आयोजन, नियोजन, अंमलबजावणी व समन्वयाची संपूर्ण जबाबदारी राज्य स्तरावर महाराष्ट्र विद्या प्राधिकरण व जिल्हा स्तरावर जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था यांची राहील.

या उपक्रमांशी संबंधित यशोगाथा त्यामध्ये केस स्टडीज्, व्हिडीओज्, Testimonials, इत्यादी उल्लेखनीय बाबींचे मराठी व इंग्रजीमध्ये दस्ताऐवजीकरण (Documentation) करून या कार्यालयास सादर करावे. जेणेकरून ते भारत सरकारच्या SSA Shagun या पोर्टलवर अपलोड करण्यासाठी सादर करण्यात येईल.

**(नंद कुमार भा.प्र.से.)**
**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

**प्रति,**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

**प्रत : माहितीस्तव,**

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,**

१) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
४) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
५) प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, सर्व जिल्हे.
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व).
७) शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व).